| | |
|---|---|
| | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५१/२०२२**<br>**मधील अर्ज निशाणी क्र. २७ खालील आदेश**<br>**( CNR-MHWS050001002022 )** |

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांतर्फे दैनिक पुण्य नगरी या पेपरमधील जाहिर नोटीस, दोन मृत्यूप्रमाणपत्र आणि वारसाचा दाखला इत्यादी कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास गैरअर्जदार यांच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. अर्जदार यांचे तर्फे विधीज्ञ श्री. वाय.एस.गिर्डेकर यांचा आणि गैरअर्जदार यांचेतर्फे विधीज्ञ श्री. आर.यु.खडसे यांचा युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांससहीत खालील प्रमाणे देत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार दाखल करु ईच्छीत असलेले दैनिक पुण्य नगरी या पेपरमधील जाहिर नोटीस, दोन मृत्यूप्रमाणपत्र आणि वारसाचा दाखला इत्यादी कागदपत्रे अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत काय? | ..होकारार्थी.. |
| २. | आदेश काय? | .. अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. ०१ बाबत</u> :–**

३. अर्जदार यांचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, या अर्जामध्ये अर्जदारांतर्फे साक्षीदार क्र. १ म्हणून अर्जदार क्र. १ सिध्दार्थ रामदास सावळे यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. १९ अन्वये दाखल केले आहे. अर्जदार हे त्या पुराव्याच्या अनुषंगाने दैनिक पुण्य नगरी या पेपरमधील जाहिर नोटीस, दोन मृत्यूप्रमाणपत्र आणि वारसाचा दाखला इत्यादी कागदपत्रे दाखल करु इच्छीत आहेत. तरी त्याची परवानगी देण्यात यावी.

४. याउलट गैरअर्जदार यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदरची

कागदपत्रे दाखल करण्यास गैरअर्जदार यांचा विरोध आहे आणि प्रस्तुतचा अर्ज अपु–या स्वरुपाचा आहे. त्यामुळे तो नामंजूर करण्यात यावा.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, अर्जदारांतर्फे अर्जदार क्र. १ यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. १९ अन्वये दाखल केलेले आहे आणि अर्जदार दाखल करु इच्छीत असलेली कागदपत्रे ही या अर्जाशी संबंधीत आहेत. तसेच त्या कागदपत्रांच्या अनुषंगाने गैरअर्जदार यांना अर्जदाराचा उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध आहे आणि अर्जदार यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. २७ मंजुर करण्यात येत आहे आणि अर्जदारांना संबंधीत कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.02.21 13:17:23 +0530

स्थळ : मंगरुळपीर
दिनांक : २१.२.२०२६.

(ध. भ. हंबीरे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per original Order.

| | | |
|---|---|---|
| 1) | Name of Stenographer | :- C.R.Gadge |
| 2) | Name of Court | :- Civil Judge (S.D.), Mangrulpir. |
| 3) | Date | :- 21.2.2026 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 21.2.2026 |
| 5) | Order uploaded on | :- 21.2.2026 |